# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना**
**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना**
**व**
**राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रीशिप योजना**
**शैक्षणिक वर्ष २०१८—१९**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजना https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून शुल्क न घेण्याबाबत तसेच योजनेसाठी विहित केलेल्या तरतुदीनुसार विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या १०० टक्के शुल्कापैकी ५० टक्के शुल्क परत करण्यासंदर्भात महाविद्यालय व विद्यापीठ विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेची अंमलबजावणी व्हावी याकरीता शासनाने महाविद्यालयांसाठी वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन करून स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत.

सदर योजना जास्तीत जास्त विद्यार्थ्यापर्यंत पोहचण्याबाबत व प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी याकरीता विद्यापीठाने परिपत्रक/पत्राव्दारे वारंवार सुचना दिलेल्या आहेत. तरी, वरील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी याकरीता शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या सुचना आपल्या महाविद्यालयाच्या/विभागाच्या नोटीसबोर्डवर दर्शनी भागावर लावाव्यात जेणेकरून जास्तीस जास्त विद्यार्थ्यांना वरील योजनांचा लाभ घेता येईल.

अर्ज करण्यासाठीच्या सर्व आवश्यक सुचना, विविध शिष्यवृत्तीची यादी शिष्यवृत्तीसाठीच्या पात्रतेचे नियम व अटी वरील संकेतस्थळावरील शासनाच्या संबधीत लिंकवर उपलब्ध आहेत.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे — ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४३८० }
दिनांक : २२/१०/२०१८ }

प्रत:

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे